स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

‘मानव्य’ विद्याशाखे अंतर्गत मराठी विषयातील पीएच डी (विद्यावाचस्पती) पदवीसाठी सादर करावयाचा शोधप्रबंध आराखडा

संशोधन विषय

रंगनाथ पठारे यांची सातपाटील कुलवृत्तांत - एक अभ्यास

संशोधक

विजय विठ्ठलराव खुमकर

बेलखेड, ता. तेल्हारा, जि. अकोला ४४४१०८

मार्गदर्शक

डॉ. विलास शेषराव पाटील

प्रोफेसर, संशोधन मार्गदर्शक आणि मराठी विभागप्रमुख,

ज्ञानोपासक महाविद्यालय, जिंतूर ४३१५०९ जिल्हा परभणी

संशोधन केंद्र

भाषा, **वाङ्मय** व संस्कृती अभ्यास संकुल, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, विष्णुपुरी, नांदेड ४३१६०६

मार्च - २०२२

प्रास्तविक -

मराठी साहित्यात कविता, नाटक, कादंबरी, चरित्र, आत्मचरित्र, निबंध, कथा आदी वाङ्मय प्रकारांचा समावेश होतो, यातील कादंबरी हा आधुनिक काळातील महत्त्वपूर्ण असा वाङ्मय प्रकार आहे. हा मुक्त, अत्यंत व समग्र लक्षी वाङ्मय प्रकार आहे. आधुनिक मराठी साहित्या**च्या इतिहासात** कादंबरी वाङ्म**याला** फार मोठी परंपरा आहे. विविध कला म्हणतात विविध कादंबरीकारांनी केलेल्या प्रयोगशील व दर्जेदार **लेखनामुळे**; ही परंपरा अधिक समृद्ध व विकसित झाली आहे.

मराठी कादंबरी १९२० ते ४७ या काळात स्वतः विषयी अधिक जागरूकपणे विचार करू लागलेली दिसते. मराठी कादंबरीच्या उगमापासून ते १९२० पर्यंतच्या कादंबरीकारांनी, किंवा कादंबरी या वाङ्मय प्रकाराविषयी विशेष आत्मीयता बाळगणाऱ्या समीक्षकांनी; कादंबरीच्या स्वरू**पा** संबंधी फारसा विचार केलेला दिसत नाही. का. बा. मराठे **यां**ची लेख व नाटक ह्या विषयी निबंध १८७२, वि. का. राजवाडे यांचा ‘कादंबरी’ हा निबंध १९०२ **व** हरिभाऊ आपटे यांच्या विदग्ध वाङ्मय या निबंधात साहित्याच्या स्वरूपाविषयी थोडी चर्चा इतकाच विचार कादंबरीकारांनी केलेला दिसतो.

कादंबरी ह्या साहित्य प्रकारातुन मानवी जीवन व्यवहाराचे दर्शन अधिक व्यापक व सखोल स्वरूपात घडत असते. कादंबरी ही अंतिमतः मानवी जीवनाची कथाच असते कादंबरी हा विस्तृत व व्यापक असा वाङ्मय प्रकार आहे. घटना, व्यक्ती, वातावरण इ. घटकांच्या साहाय्याने, मानवी जीवनाशी निगडित असणाऱ्या वास्तवाचे विविध स्तरीय व्यामिश्र स्वरूपाचे दर्शन, कादंबरी घडवीत असते.

प्रा रंगनाथ पठारे हे १९६० नंतरचे श्रेष्ठ दर्जाचे कादंबरीकार, दनकट कथाकार, समीक्षक आणि विचारवंत म्हणून गेली ४० वर्षे; ते अविरतपणे मराठी साहित्याला योगदान देत आलेत. मराठी साहित्यात त्यांचे अव्वलस्थान आहे सुमारे चाळीसेक मौलिक ग्रंथ त्यांच्या नावावर आहेत. 'ताम्रपट' ह्या महाकादंबरीने ते पहिल्या श्रेणीचे कादंबरीकार बनले. वीस वर्षे अभ्यास केल्यानंतर सात पाटील कुलवृत्तांत **ही** सातशे शहाण्णव **पृष्ठां**मधून, सुमारे आठशे वर्षाचा महाकाय पट, मराठा योद्धे आणि समाज जीवनाचा वेध घेणारी त्यांची कादंबरी; संपूर्ण भारतवर्षाची परिक्रमा करते. या कादंबरीला अनेक सोशल, पॉलिटिकल आणि सांस्कृतिक डायमेन्शन्स आहेत.

एका तरुणाने त्याच्या वंशाचा घेतलेला धांडोळा हा या कादंबरीचा (प्लॉट) आहे. हा धांडोळा थोडाथोडका नव्हे, तर राम देवराय यादव, अल्लाउद्दीन **खि**लजी यांच्या काळापासून ते आतापर्यंत; असा तब्बल आठशे वर्षांचा आहे. वेगवेगळ्या सात टप्प्यात घेतलेला हा शोध, केवळ एक जातीचा, धर्माचा वा प्रदेशाचा नव्हे तर संपूर्ण भारतीय संस्कृतीचा; आणि त्याहूनही पुढे जाऊन एकूणच मानवाच्या वाटचालीचा प्रचंड पट उघडून दाखवणारा आहे.

प्रा रंगनाथ पठारे यांची 'सातपाटील कुलवृत्तांत' ही कादंबरी पर्यायी इतिहासाची दृष्टी देणारी आहे. तसेच वंशश्रेष्ठत्वाच्या दंभावर प्रहार करणारी, स्त्रीत्वाची महिती सांगत, जातीच्या अहंकाराला टाचणी मारत, प्रस्थापित संस्कृती - विचारांना छेद देणारी; एक महत्त्वपूर्ण कादंबरी आहे. म्हणून या कादंबरीचा विवेचक अभ्यास करणे गरजेचे ठरते.

रंगनाथ पठारे यांनी मराठी साहित्याला नवीन दृष्टी-दिशा आणि नवा विचार दिला. त्यांनी कथा, कादंबरी, समीक्षा असे सर्वांगांनी समृद्ध लिखाण केले, यातून

मराठी वाङ्मयला नवे परिमाण मिळाले. ‘सातपाटील कुलवृत्तांत’ ही कादंबरी प्रगतिशील भूमिका अधोरेखित करते, म्हणून ती**चा** अभ्यास करणे अपरिहार्य आणि महत्वा**चे** ठरते.

संशोधनाची गरज -

प्रस्तावनेत विषद केल्याप्रमाणे ‘सातपाटील कुलवृत्तांत’ या कादंबरीआधारे समाजजीवनातील नीतिमूल्ये, संस्कारमूल्ये, कृषिनिष्ठ संस्कृती, जातीव्यवस्था, स्त्रीजीवन, निसर्ग, प्राणीजीवन; मराठी कादंबरीच्या विकासाची नवी दिशा सूचित करणारी कादंबरी म्हणून, विवेचक अभ्यास करणे मला गरजेचे वाटते.

संशोधनाची व्याप्ती -

या प्रबंधाची व्याप्ती कादंबरीकार रंगनाथ पठारे यांच्या ‘सातपाटील कुलवृत्तांत’ या कादंबरीचा महाराष्ट्रीय संस्कृतीच्या दृष्टिकोनातून अभ्यास करणे; **ही** संशोधनाची व्याप्ती आहे.

अभ्यास मर्यादा -

रंगनाथ पठारे यांच्या ‘सातपाटील कुलवृत्तांत’ या कादंबरीच्या विशेषांचा अभ्यास या संशोधनात अंतर्भूत आहे. त्यांनी लिहिलेली **ही** कादंबरी, व त्यांचा इतर कादंबरीवरील टिकालेख व ग्रंथ या संशोधनासाठी लिखित सामग्री असेल. शेवटी त्यांची मुलाखत घेण्यात येईल या व्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याही विषयाचा अभ्यास अपेक्षित नाही.

गृहीतके -

1) प्रा रंगनाथ पठारे यांच्या कादंबरी वाङ्मय पाठीमागील पार्श्वभूमी उजागर करणे.

2) त्यांच्या कादंबरीतून व्यक्त झालेल्या समाज वास्तवाचा शोध घेणे.

3) महाराष्ट्रीय संस्कृतीचा शोध घेणे.

4) प्रा रंगनाथ पठारे यांच्या लेखनातील वेगळेपण लक्षात घेऊन, उदध्वस्त झालेले जगणे, मनोव्यापार, ताणतणाव; यामुळे समाज जीवनावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.

5) कादंबरीतील स्वाभिमानी माणसांचे व निडर खंबीर स्त्रियांच्या स्वभाव विशेषांचा अभ्यास करणे.

6) पोटातील भुकेची आग विझवण्यासाठी व जगण्यासाठी धडपडणाऱ्या; माणसांच्या व्यथांचा अभ्यास करणे.

7) या कादंबरीच्या माध्यमातून भाषेच्या जीवाश्मांमध्ये लपून राहिलेल्या मुळांचा शोध घेणे.

8) काही बीजात्मक स्त्रीरूपांचा शोध घेणे.

9) बहुजनांच्या सांस्कृतिक पुनर्शोधाची मूळ कथा अभ्यासणे.

10) कादंबरीतून आलेले ग्रामीण माणसाचे जगणे, वागणे, आचार-विचार, दृष्टिकोन, भावभावना, जीवनावश्यक दृष्टी, ग्रामीण समाज जीवन सण-उत्सव, कृषी जीवनाविषयीची तळमळ; यांचा शोध घेणे.

संशोधनाचे महत्त्व -

आधुनिकीकरण आणि जागतिकीकरणाच्या काळात, महाराष्ट्रीय समाजजीवन स्थितीत झालेले बदल अभ्यासणे गरजेचे आहे. मानवी जीवनात नेहमी माणूस आणि तो समूह करून राहत असलेल्या समाजाला, अनन्य साधारण महत्त्व राहिले आहे. काळानुरूप त्यावर होणारे बरे वाईट परिणाम, समाजजीवनाच्या बदलास कारणीभूत ठरतात. ग्रामजीवनातील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय बदल खेड्यात जीवन जगणाऱ्या सामान्य माणसावर प्रभाव टाकतात.

देशीवादाची आजवरची उलट-सुलट मांडणी लक्षात घेता, एक सुस्पष्ट अशी व्याख्या देशीयतेच्या तत्त्वांचा - मूल्यांचा विचार केंद्रस्थानी ठेवून करता येईल. देशीवाद ही अशी मूल्यव्यवस्था आहे की, जीच्यात भूमितत्व, भौगोलिकता, जातिव्यवस्था, वंश, भाषा, धर्म, आध्यात्मिकता, पारलौकिकता, दैवत कल्पना, ईश्वराची आराधना-प्रार्थना, नियती, प्रारब्ध, काळ, परंपरा, ऐतिहासिकता, संस्कृती, संस्कृती सहयोग, देशीकरण, स्थितीशीलता, गतिशीलता, आधुनिकता, आक्रमकता आदी मूल्यांना; प्रेरित आणि प्रभावित करून, सामाजिक कला माध्यमातून त्यांची एकसमयावच्छदेकरून अविष्कार करणारी, मूल्यनिष्ठ आणि मूल्य निर्मिती करणारी; मानवी समूहाला अस्मिता, अस्तित्व, आत्मतेज व आत्मसन्मान देणारी विचारप्रणाली होय. या दृष्टीने संशोधनाचे महत्त्व आहे.

संशोधनाची साधने -

1) प्रस्तुत संशोधनासाठी रंगनाथ पठारे यांच्या मूळ 'सातपाटील कुलवृत्तांत' या कादंबरीचा आधारभूत साधन म्हणून वापर करण्यात येईल.

2) पठारे यांच्या कादंबर्यावरील **टी**कालेखांचा अभ्यास करून मिळालेल्या माहितीची वस्तुनिष्ठपणे मांडणी करण्यात येईल.

3) ग्रंथालयातील संदर्भग्रंथ व इतर ग्रंथांचा वापर करण्यात येईल.

4) नियतकालिके, प्रसिद्धलेख, वर्तमान पत्रातील लेख व अंकांचा वापर करण्यात येईल.

5) रंगनाथ पठारे यांच्या वरील टीकाग्रंथ, संशोधन, मनोगते आणि अनेक संदर्भ ग्रंथांचा आधार घेतला जाईल.

संशोधन पद्धती -

रंगनाथ पठारे यांच्या कादंबरीचा अभ्यास करीत असताना, अभ्यासातील प्राथमिक आणि दुय्यम स्रोतांचा योग्य रीत्या वापर करण्यात येईल. तसेच मुलाखत, विश्लेषण, ऐतिहासिक संशोधन पद्धती प्रसंगी इंटरनेटवरील साहित्य; या पद्धती तसेच व्यक्ती व संशोधन पद्धतीचाही (**Case Study**) अवलंब करण्यात येईल.

संशोधनाचा उद्देश / हेतू -

1) मराठी कादंबरीची प्रेरणा आणि विकासात रंगनाथ पठारे यांचा सहभाग उलगडून दाखवणे.

2) एक समर्थ कादंबरीकार म्हणून पठारे यांच्या कादंबरी चा अभ्यास करणे.

3) महा कादंबरीच्या इतिहासात 'सातपाटील **कुलवृत्तांताचे'** स्थान निश्चित करणे, आणि या कादंबरीचा सर्वांगाने अभ्यास करणे; हा संशोधकाचा हेतू आहे.

संभाव्य निष्कर्ष -

प्रस्तुत संशोधनाआधारे मराठी कादंबरीचे स्वरूप व वैशिष्टये साधार पहावयास मिळतात. पठारे यांच्या साहित्याला प्रेरणा देणाऱ्या गोष्टींचे स्वरूप पहायला मिळते. बदलत्या समाज वास्तवतेचा आशय असणाऱ्या कादंबरी साहित्याची अंगभूत वैशिष्ट्ये नोंदवता येतील. तसेच समाजजीवनाशी निगडित वैचारिकतेची भूमिकाही अभ्यासता येईल.

प्रकरण रचना

प्रकरण **1- उपोद्घात**

प्रस्तुत प्रकरणात अभ्यास विषयाची प्रस्तावना, संशोधनाचे महत्त्व, अभ्यास विषयाची उद्दिष्टे, संशोधनाची व्याप्ती, मर्यादा या सर्व बाबींचा अभ्यास या प्रकरणात केला जाणार आहे.

प्रकरण **2** - २००० नंतरची मराठी कादंबरी

या प्रकरणात सन २००० नंतर मराठी कादंबरी ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, आदिवासी अंगाने कशी विकसित होत गेली; या बाबी नोंदवण्यात येतील.

प्रकरण **3** - मराठीतील महाकादंबऱ्या

सदर प्रकरणात महाकादंबऱ्यांचा प्रवास कसा झाला ? समर्थ लेखक आणि त्यांनी लिहिलेल्या महाकादंबऱ्यांचा ऐतिहासिक आढावा घेतला जाईल.

प्रकरण **4** - रंगनाथ पठारे यांचे जीवन आणि साहित्य

प्रस्तुत प्रकरणात पठारे यांच्या जीवन आणि साहित्याचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण **5** - 'सात पाटील कुलवृत्तांत' - स्वरूप

या प्रकरणात कथानक, सामाजिक व सांस्कृतिक परिसर, काळ व वारकरी संप्रदायाचा प्रभाव, वांशिक दुराभिमानाला धक्का देणारी पात्रे या व इतर विशेषांचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण **6** - वंशावळ आणि पुरुष पात्रे

या प्रकरणांमध्ये कादंबरीतील वंशावळ व पुरुषपात्रांचा विचार करण्यात येईल.

प्रकरण **7** - स्त्री व्यक्ती रेखा

सदर प्रकरणात प्रस्तुत कादंबरीतील स्त्री व्यक्ति रेखांचा अभ्यास केला जाईल.

प्रकरण 8 - देशीयता

या प्रकरणात प्रस्तुत कादंबरीच्या आधारे देशीयतेच्या मूल्यांवर प्रकाश टाकला जाईल.

प्रकरण 9 - भाषा आणि शैली

प्रस्तुत प्रकरणांत कादंबरीची भाषा व लेखन शैलीचा सर्वांगीण अभ्यास केला जाईल.

प्रकरण 10 - उपसंहार

कथा-कादंबरीकार समीक्षक म्हणून पठारे यांची महाराष्ट्रभर तसेच भारतभर ओळख आहे, कादंबरीकार म्हणून त्यांचा विकास कसा होत गेला ? नंतर साहित्यिक म्हणून भारतभर झालेली ओळख आणि मराठीत एक समर्थ कादंबरीकार म्हणून मिळालेला नावलौकिक; या सर्व बाबींचा आढावा या प्रकरणात संशोधक घेणार आहे. तसेच, पठारे यांच्या कादंबरीच्या अभ्यासातून मला जाणवलेले निष्कर्ष नोंदवले जातील.

परिशिष्टे -

अ) रंगनाथ पठारे यांची मुलाखत

ब) संदर्भ ग्रंथ सूची

क) रंगनाथ पठारे यांचे प्रकाशित साहित्य व मानसन्मान

रंगनाथ पठारे यांची ही कादंबरी लक्षात घेता, ती मराठी सारस्वताच्या वळणावरील एक प्रमुख टप्पा आहे; हे लक्षात येईल. कादंबरीकार म्हणून पठारे

यांची झालेली जडणघडण, त्यांचे जगणे आणि कादंबरीसंबंधी विचार, भूमिका आणि मत मतांतरे यातून त्यांचे समीक्षेच्या अंगाने व्यक्तिमत्व शब्दांकित करणे आणि त्यांच्या कादंबरीचे वेगळेपण; सर्वांगांनी उकलून दाखवणे हा प्रस्तुत प्रबंध काराचा मानस आहे.

संशोधक	मार्गदर्शक
विजय विठ्ठलराव खुमकर	डॉ. विलास शेषराव पाटील
बेलखेड, ता. तेल्हारा, जि. अकोला ४४४१०८	प्रोफेसर, संशोधन मार्गदर्शक आणि मराठी विभाग प्रमुख,
	ज्ञानोपासक महाविद्यालय, जिंतूर ४३१५०९ जिल्हा परभणी

संदर्भ ग्रंथ -

1) वाघमारे राम - समकालीन कादंबरीकार भालचंद्र नेमाडे आणि रंगनाथ पठारे, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्रथमावृत्ती २०१५.

2) पाटील तानाजी राहू - मराठी कादंबरी समीक्षा, डायमंड पब्लिकेशन, पुणे प्रथम आवृत्ती २००९.

3) बांदिवडेकर चंद्रकांत - मराठी कादंबरीचा इतिहास, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती १९८९.

4) लांडे सुमती - शब्दालय दिवाळी २०२०, सातपाटील कुलवृत्तांत विशेषांक.

5) मंचरकर र.बा. **-** सामाजिक परिवर्तन आणि मराठी साहित्य, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २०११.

6) पठारे रंगनाथ **-** ताम्रपट, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती १९९४.

7) पठारे रंगनाथ **-** सातपाटील कलवृत्तांत शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर तृतीय आवृत्ती २०१९.

8) देशपांडे अ.ना. **-** प्राचीन मराठी वाङ्मय चा इतिहास व्हीनस प्रकाशन पुणे प्रथमावृत्ती १९८८.

9) कॉन्टिनेन्टल प्रकाशन **-** प्रदक्षिणा, खंड पहिला, प्रथमावृत्ती १९४१.

10) पांगारकर ल.रा. **-** मराठी वाड्मयाचा इतिहास, विदर्भ मराठवाडा बुक कंपनी, पुणे, तृतीय आवृत्ती १९७२.